झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
अनुक्रमांक 221
दि. 12 JUL 1996

Ajit Warty
Prin. Secretary

D.O.No. 1093/471/Prin-secy
Housing and Special
Assistance Department,
Mantralaya, Mumbai-32.

Date : 10th July 96.

My dear Joseph,

In continuation of my letter No. 1096/470 dated 10th July 1996 regarding the meeting of the Slum Rehabilitation Authority scheduled to be held at 5.30 PM on Saturday, the 20th July 1996 at Sahyadri Guest House, I have to request you to please send me 5 copies of the agenda, detailed item notes and the list of invitees. This is required by the C.M's Secretariat.

Regards

Yours sincerely,

(Ajit Warty)

11.7.1996

Shri D.T. Joseph,
Chief Executive Officer,
Slum Rehabilitation Authority,
Griha Nirman Bhavan,
Bandra East,
Mumbai 400 051.

पृ.३/टि.वि

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

मा. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या पूर्वपृष्ठावरील निदेशाप्रमाणे, त्यांच्याशी चर्चा करुन पुन्हा सादर.

प्राधिकरणाची दूसरी बैठक दिनांक २० जुलै १९९६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये एकंदर ४ बाबी/प्रस्ताव प्राधिकरणासमोर ठेवण्यात आल्या होत्या. या प्रस्तावांच्या बाब टिप्पण्या इंग्रजी व मराठीमध्ये पृष्ठ १३५ ते १९८ प.वि. वर माहितीसाठी ठेवलेल्या आहेत. त्यातील पहिली बाब टिप्पणी, बाब क्रमांक-२/१ ही दिनांक १५/३/९६ च्या प्राधिकरणाच्या पहिल्या बैठकीचे कार्यवृत्त मंजूर करण्यासंबंधीची होती. दूसरी बाब टिप्पणी, क्रमांक-२/२ ही प्राधिकरणाच्या आस्थापनेवर अधिकारी/कर्मचारी प्रतिनियुक्तीने घेण्यासंबंधात केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्याविषयीची असून माहितीसाठी होती. तिसरी बाब टिप्पणी, क्रमांक-२/३ ही प्राधिकरणाच्या स्थापनेपासून दूसऱ्या बैठकीच्या कालावधीपर्यंत केलेल्या कार्यवाहीसंबंधात माहितीसाठी होती. चौथी बाब टिप्पणी क्रमांक-२/४ ही प्रारुप विकास नियंत्रण नियमावली ३३, परिशिष्ट-४, परिशिष्ट-७ब यांना प्राधिकरणाची मंजूरी घेण्यासंबंधातील होती.

वरील परिच्छेदातील विषय दिनांक २० जुलै १९९६ च्या बैठकीत, क्रमवार चर्चेस घेतले जाऊन, ह्या चर्चेप्रमाणे बैठकीचे कार्यवृत्त तयार करुन ते पृष्ठ १९९ ते २०८/प.वि. प.वि. वर सादर केले आहे.

दि.१५/३/९६ च्या बैठकीचे कार्यवृत्त जेव्हा मा.मुख्यमंत्र्यांच्या मंजूरीसाठी पाठविले होते, तेव्हा त्यांच्या कार्यालयाकडून असे निदेश देण्यात आले होते की, मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकांचे कार्यवृत्त त्यांनी निर्धारीत केलेल्या विहित पध्दतीने सादर करावे.

तात्पर्य, नेहमीच्या पध्दतीने तयार केलेले दि.२० जुलै १९९६ च्या बैठकीचे कार्यवृत्त पृष्ठ १९३ ते २०९/ प.वि. वर मा.मुख्यमंत्र्यांच्या मंजूरीसाठी सादर. त्याचप्रमाणे मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाकडून मिळालेल्या निदेशानुसार विहित पध्दतीने तयार केलेले बैठकीचे कार्यवृत्त मा.मुख्यमंत्र्यांच्या मंजूरीसाठी पृष्ठ 293 ते २५ प.वि. वर सादर.

सचिव/प्रशासकीय अधिकारी

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी

मा.अध्यक्ष व मुख्यमंत्री.

मुख्य कार्यकारी अधिकारी
दिनांक 20/8/96
क्रमांक 4242

पृ. 203 येथे सुधारल्याप्रमाणे इतिवृत्त मान्य व्हावे.
मान्यतेस्तव सविनय सादर मा. मुख्य सचिव

मा. अध्यक्ष व मा. मुख्यमंत्री

मुख्य सचिव

मु. का. अ 8/8/96

मं. स. आप्पा ढाले 1/8/96 / 25/8/96

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या दुसऱ्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २० जुलै, १९९६. |
| वेळ | : | सायंकाळी ५.३० वाजता. |
| ठिकाण | : | सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई. |

बैठकीस उपस्थित असलेल्या सन्माननीय सदस्यांची यादी सोबत जोडली आहे.

बाब क्र. २/१

प्राधिकरणाच्या पहिल्या बैठकीचे कार्यवृत्त मंजूर करण्याचा ठराव पारीत झाला.

बाब क्र. २/२

प्राधिकरणाच्या माहितीसाठी.

बाब क्र. २/३

प्राधिकरणाच्या माहितीसाठी.

बाब क्र. २/४

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये, प्रारुप विकास नियंत्रण नियमावली, ज्यामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेशी संबंधित विकास नियंत्रण नियमावली ३३, परिशिष्ट-४, परिशिष्ट-७ब, संक्रमण शिबीरांची तरतूद, इत्यादींचा समावेश आहे, तिच्यामध्ये केलेल्या सुधारणांसह, शासनाच्या नगर विकास विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याचा ठराव पारीत झाला.

यापुढे असा देखिल ठराव पारीत झाला की, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांना वरील कार्यवाही करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले.

# बैठकीचे कार्यवृत्त

सदर बैठकीला ठरल्याप्रमाणे सायंकाळी ५.३० वाजता प्रारंभ झाला. बैठकीला सुरवात करतांना मा. अध्यक्षांनी कार्यसूचीतील मुद्दा क्र. १ म्हणजे दि. १५.३.९६ च्या बैठकीचे कार्यवृत्त पक्के करण्यासंबंधी सर्व सदस्यांना उद्देशून असे विचारले की, ह्या कार्यवृत्तासंबंधी कोणास कांही सांगावयाचे आहे काय? ह्यासंबंधी कोणी कांही प्रश्न उपस्थित केला नाही. मा. श्री. वैरे, मंत्री, गृहनिर्माण यांनी मागील बैठकीचे कार्यवृत्त ठीक असल्याचे सांगितले व त्याप्रमाणे मागील बैठकीचे कार्यवृत्त मंजूर/पक्के झाल्याचे सर्वानुमते ठरले.

कार्यसूचीतील दुसऱ्या विषयासंबंधी बैठकीत सविस्तरपणे चर्चा झाली. प्राधिकरणात प्रतिनियुक्तीवर येण्यास शासकीय अधिकारी/कर्मचारी इच्छुक नसल्याचे मा. अध्यक्षांच्या निदर्शनास आणले गेले. त्यावर बोलतांना मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, मंत्रालयातील अधिकारी/कर्मचारी यांना प्राधिकरणात प्रतिनियुक्तीवर पाठविले पाहिजे व त्यासाठी मुख्य सचिवांनी व्यक्तीश: लक्ष घालून कार्यवाही करावी. तथापि, या संदर्भात मुख्य सचिव व अतिरिक्त मुख्य सचिव, नगर विकास यांनी स्पष्टीकरण दिले. अति. मुख्य सचिव यांनी स्पष्टीकरण देतांना असे सांगितले की, महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतूदीप्रमाणे अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या इच्छेविरुध्द त्यांना प्रतिनियुक्तीवर पाठविता येत नाही. त्यामुळे प्राधिकरणात प्रतिनियुक्तीने अधिकारी/कर्मचारी भरण्याच्या संदर्भात कोणत्याही राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या इच्छेविरुध्द प्राधिकरणात पाठविता येणार नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांनी असे मत मांडले की, ह्या विषयासंबंधी श्री. वर्टी, प्रधान सचिव यांनी त्यांची भूमिका मांडावी. त्याप्रमाणे श्री. वर्टी यांनी असे सांगितले की, त्यांच्या विभागातून जितके कर्मचारी प्राधिकरणाला देणे शक्य होते तेवढे दिले आहेत. गृहनिर्माण विभागात कर्मचारी/अधिकाऱ्यांची बरीच पदे रिक्त आहेत, त्यामुळे आता गृहनिर्माण विभागातून प्राधिकरणास आणखी अधिकारी/कर्मचारी देता येणार नाहीत. त्यांनी अशीसुध्दा भूमिका मांडली की, प्राधिकरणाने जाहिरातीद्वारे अधिकारी/कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी किंवा बीएमआरडीए, सिडको सारख्या संस्थांतून तसेच शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची कांही विशिष्ट कालावधीसाठी

नियुक्त ...ो. मा. मंत्री [गृ. नि.] यांनी यासंबंधी असे सांगितले की, म्हाडाच्या अमरावतीसारख्या मंडळाकडे अजिबात काम नाही. तेव्हा तेथील कर्मचाऱ्यांना प्राधिकरणात घ्यावे. यावर म्हाडाच्या कर्मचाऱ्यांना कदापि घेऊ नये असे मुख्य सचिवांनी सांगितले. तसेच मुख्य सचिवांनी असेही सांगितले की, नियमाला अनुसरुन जाहिराती-द्वारे लायक व्यक्तींची प्राधिकरणाने नियुक्ती करण्यास कोणातिच हरकत नाही.

प्राधिकरणाच्या सेवेत घेतल्या जाणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना विशेष वेतन त्याचबरोबर निवासाची व्यवस्था इत्यादी सुविधा उपलब्ध करुन दिल्यास प्राधिकरणाकडे अधिकारी/कर्मचारी आकर्षित होऊ शकतील असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सुचविले व त्याला अध्यक्षांनी सहमती दर्शविली.

ह्या विषयासंबंधी शेवटी आदेश देतांना मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, अधिकारी/कर्मचारी यांची प्राधिकरणात नियुक्ती करता येत नाही म्हणून प्राधिकरणाच्या कामाचा खोळंबा होता कामा नये. त्यासाठी जाहिरातीद्वारे अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

तद्नंतर मा. अध्यक्षांनी बाब क्र. २/३ संबंधात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी प्राधिकरणाच्या स्थापनेनंतर प्राधिकरणाने कोणाकोणती महत्वाची कामे केली याचा टिप्पणीमध्ये उहापोह केल्याचे सांगून, योजना राजपत्रात प्रसिध्द करणे, ३० दिवसांची मुदत देऊन सूचना व आक्षेप मागविणे, ह्या कालावधीत घेतलेल्या एकंदर सुनावण्या व त्याप्रमाणे आवश्यक वाटल्यास विकास नियंत्रण नियमावलीत केलेल्या सुधारणा इत्यादी महत्वाच्या मुद्यांवर केलेल्या कार्यवाहीचे विवेचन केले. तसेच ही बाब मा. अध्यक्ष व प्राधिकरणाच्या सदस्यांच्या माहितीसाठी ठेवली असल्याचे सांगितले.

तद्नंतर मा. अध्यक्षांनी मु.का.अ. यांना बाब क्र. २/४ मधील विकास नियंत्रण नियमावलीचे मुख्य घटक स्पष्ट करून सांगण्यास सांगितले. त्यावेळी नवीन योजनेप्रमाणे कामास केव्हा प्रारंभ होईल अशी विचारणा करण्यात आली. त्यावर खुलासाकरतांना अति. मुख्य सचिव [न.वि.] यांनी असे सांगितले की, नोटीशीद्वारे एकदा का अंतिम विकास नियंत्रण नियमावली ३३[१०] प्रसिध्द झाली की, एमआरटीपी ॲक्ट, १९६६ च्या कलम ४६ अन्वये मुख्य कार्यकारी अधिका-यांना योजनेस मंजूरी देण्याचे अधिकार प्राप्त होतील. मु.का.अ. यांनी असे सांगितले की, दोन्हीपैकी जे कठोरतम आहे ते लागू करण्याची सध्याची प्रथा आहे.

झोपडपट्टी पुनर्बांधणी योजना सद्या मुंबई महानगरपालिकेकडून मंजूर होत आहेत. तथापि, यापुढे ह्या योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून मंजूर केल्या जातील, तशी तरतूद प्रारूप विकास नियंत्रण नियमावलीच्या कलम २ मध्ये करण्यात आलेली आहे. यासंबंधी श्री. गोखले आयुक्त, मुंबई महापालिका यांनी असे सांगितले की, योजनेच्या संदर्भातील सर्व शुल्क प्राधिकरणाने वसूल केल्यास, योजनेसाठी पायाभूत सुविधा देण्याची जबाबदारी महापालिकेची राहील परंतु त्यासाठी पालिकेकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन उपलब्ध राहणार नाही. याच्या उत्तरामध्ये बैठकीत असे प्रतिपादन करण्यात आले की, या विषयावर अफझुलपूरकर समितीच्या बैठकीत सखोल चर्चा झालेली असून मंत्रीमंडळाच्या बैठकीतसुध्दा चर्चा झालेली आहे. प्राधिकरणाने यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेत सद्या अधिकारी/कर्मचारी वर्ग काम करीत आहे त्यांना प्राधिकरणात प्रतिनियुक्तीवर घ्यावे. आयुक्त, मुंबई महापालिका यांनी यासंबंधात असे सांगितले की, तेच अधिकारी/कर्मचारी जर प्राधिकरणात घेतले गेले तर कोणताच फरक पडणार नाही. तथापि, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये स्विकारण्यात आलेला उदार दृष्टीकोन/प्रोत्साहन व ह्या योजनेत केलेल्या सुधारणा यामुळे प्राधिकरणातील वरीष्ठ अधिका-यांना योजनांच्या मंजूरीस गती देता येईल व योजनेतील अडचणीदेखील सोडविता येतील.

मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांनी योजनांना मंजूरी देण्याच्या संदर्भात पुढे असे सांगितले की, जेव्हा एखाद्या प्रकरणात मंजूर नियमावलीच्या बाहेरील सवलती द्याव्या लागतील तेव्हा अशा बाहेरील सवलती देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिका-यांना असावेत. या प्रस्तावासंबंधी मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, मंजूर नियमावली बाहेरील सवलती देण्याचे अधिकार एकतर अध्यक्षांना किंवा प्राधिकरणाला असावेत. यावर मुख्य कार्यकारी अधिका-यांनी असे सांगितले की, अशाप्रकारचे अतिरिक्त अधिकार आयुक्त, मुंबई महापालिका यांना प्रदान केलेले आहेत. अध्यक्षांनी यासंबंधी अशी प्रतिक्रिया व्यक्त केली की, तसे असल्यास त्यांचे अधिकार कमी करण्यासंबंधी विचार करावा लागेल.

यापुढे अध्यक्षांनी असे सांगितले की, पुनर्वसनासाठी मोठया झोपडपट्ट्या प्राधान्याने घ्याव्यात. जेथे केवळ १५/२० झोपडया आहेत व आकाराने लहान आहेत त्या सुरवातीला पुनर्वसनासाठी घेण्याची गरज नाही. त्यांनी असेसुध्दा निदेश दिले की, गणना झालेल्या किंवा घोषित झालेल्या ज्या २३३५ झोपडपट्ट्या आहेत त्यांच्यासंबंधात महापालिकेच्या विभाग अधिका-यांकडून योजना राबविण्यासंदर्भातील सद्य:स्थिती दर्शविणारी माहिती एकत्रित करावी. अशी माहिती त्यांच्याकडून निश्चितच गोळा करता येईल. या माहितीमध्ये किती झोपडपट्टीवासियांची सहमती घेण्याचे प्रयत्न चालू आहेत, त्यांनी कोणता वास्तुशास्त्रज्ञ/बिल्डर निवडला आहे, झोपडपट्टीचे एकंदर क्षेत्र किती आहे, विकासक व झोपडपट्टीवासियांच्यामध्ये करार झालेला आहे काय इत्यादी माहिती उपलब्ध होईल.

मा. अध्यक्षांना दिलेल्या प्रारुप सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३[१०] च्या अनुषंगाने श्री. जोसेफ यांनी असे स्पष्टीकरण दिले की, नियमावलीमध्ये लाल रंगाने व हिरव्या रंगाने दाखविलेला मजकूर दि. २५.४.९६ च्या राजपत्रात प्रसिध्द केलेल्या मूळ मसुद्यात केलेल्या सुधारणा दर्शवितो. त्यापैकी लाल रंगाच्या मजकूरामध्ये मूळ प्रारुपात भरीव स्वरुपाची सुधारणा केलेली आहे. म्हणून १५ दिवसांची मुदत देऊन हे प्रारुप विकास नियंत्रण नियम राजपत्रात प्रसिध्द केले जावे. कारण मूळ प्रारुपामध्ये आपण कोणत्या सुधारणा केल्या आहेत ते जनतेस कळून येईल. या संदर्भात अति. मुख्य सचिव [न. वि. ] यांनी

मा. अध्यक्षांच्या असे नजरेस आणून दिले की, मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने शासनाने मंजूर केलेली पुणे महानगरपालिकेची सुधारीत विकास नियंत्रण नियमावली रद्दबातल ठरविली आहे. उच्च न्यायालयाच्या निवाडयाची प्रत जुलैच्या पहिल्या आठवडयात प्राप्त झाली असून यासंबंधात अपिल करावयाचे किंवा कसे, एस.एल.पी. करावयाची किंवा कसे याचा विचार चालू आहे. आणि म्हणून वेळ वाचविण्यासाठी प्राधिकरणाने प्रारूप सुधारीत विकास नियंत्रण नियमावली त्यांच्या स्तरावर पुन्हा प्रसिध्द करण्याऐवजी त्यांनी ही नियमावली शासनाच्या नगर विकास विभागाकडे पाठवावी. (+)

(+) तदनंतर हि नियमावली न.वि. विभागाने प्रसिद्ध करावी. कायद्याच्या तरतुदीप्रमाणे प्रसिद्ध करण्याचे कारण नसून नवीन नियमावली अंमल केला येणे शक्य आहे असे आदेश न.वि. विभागाने कलम १५४ प्रमाणे द्यावे असे ठरले.

मुख्य कार्यकारी अधिकारी प्राधिकरण यांनी जेव्हा योजनेच्या कांही धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्याची गरज आहे असे सांगितले तेव्हा यासंबंधी अशी चर्चा झाली की, जेव्हा एखादे क्षेत्र झोपडपट्टी म्हणून घोषित झाले असेल तेव्हाच पुनर्वसन योजना लागू करता येते. मु.का.अ. यांनी यासंबंधात असे स्पष्टीकरण दिले की, कोणतेही क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करुन ते झोपडपट्टी पुनर्वसनासाठी घेता येत नाही. त्याचवेळी त्यांनी हेसुध्दा स्पष्ट केले की, औपचारीकतेवर अकारण वेळ न दवडता, विकास नियंत्रण नियमावलीचे प्रारूप अशा पध्दतीने तयार केलेले आहे की, ज्या कांही पूर्वी गणना, घोषित झालेल्या झोपडपट्टया आहेत आणि यापुढे घोषित केल्या जाणार आहेत अशा झोपडपट्टयांना आपोआप झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राचा दर्जा प्राप्त होईल. याची यासाठी गरज आहे की, महाराष्ट्र झोपडपट्टी [सुनिवपु] अधिनियम, १९७१ मध्ये केलेल्या सुधारणामुळे, झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राच्या मर्यादितच प्राधिकरणाला अधिकार प्राप्त होतात. यावर मतप्रदर्शन करीत असतांना मुख्य सचिवांनी असे सांगितले की, अधिनियमातील हया तरतूदीमुळेच प्राधिकरण अडचणीत येऊ शकते. कारण सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत झोपडपट्टी घोषित करणे, त्यानंतर जमीनमालकाला नोटीस देणे, झोपडपट्टी न्यायाधिकरणाकडे अपिल करणे या गोष्टीमध्ये अकारण वेळ जातो व परिणामत: झोपडपट्टी पुनर्वसन कार्यक्रमाला खिळ बसते.

यावर मा.अध्यक्षांनी असे निदेश दिले की,ग्राम्स विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अशासारखे जे कांही तांत्रिक मुद्दे आहेत त्यावर संबंधित अधिका-यांच्या एका लहानशा उपसमितीमार्फत शासन स्तरावर अंतिम करावेत. या विषयाचे महत्व पटवून देतांना मुख्य कार्यकारी अधिका-यांनी असे उदा. दिले की, यशोधन इमारतीतील चतुर्थश्रेणी कर्मचारी किंवा मंत्रालय कँटीनमध्ये वास्तव्य करणारे स्वच्छक त्यांचे नांव १.१.९५ च्या मतदार यादीत असल्यामुळे २२५ चौ.फुटाची मोफत सदनिका मागतिल, किंवा धोकादायक इमारतीतील रहिवाशी मतदार यादीचा उतारा घेऊन येतील व झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे फायदे मागतिल. यावर मुख्य सचिवांनी असे सांगितले की, अशाप्रकारची मागणी आल्यास प्राधिकरणाने ती नाकारावी. त्यावर मुख्य कार्यकारी अधिका-यांनी स्पष्ट केले की, अशी मागणी जर नाकारायची असेल तर त्यासाठी कायद्याचा स्पष्ट आधार असणे आवश्यक आहे. म्हणून प्राधिकरणाने कोणती मागणी नाकारावी व कोणते क्षेत्र पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करावे यासाठी निकष ठरविणे आवश्यक आहे. त्यांनी पुढे असेही सुचविले की, महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम, कलम ४ मध्ये निर्धारित केलेल्या निकषांची जोपर्यंत पूर्तता होत नाही तोपर्यंत कोणतेही क्षेत्र पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करता येणार नाही. मा.अध्यक्षांनी यावर असा निर्णय दिला की, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संबंधित अधिका-यांनी एकत्र बसून यावर निर्णय घ्यावा.

यानंतर झोपडपट्टीवासियांच्या नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये महिलांचे प्रमाण किती असावे, यावर चर्चा झाली. या विषयावर श्रीमती शीला पटेल यांनी असे मत प्रदर्शन केले की, निवा-याच्या प्रश्नामध्ये महिलांना प्राधान्य मिळणे आवश्यक आहे. मु.का.अ. यांनी असे स्पष्टीकरण केले की, गृ.नि.संस्थेमध्ये प्रामुख्याने पुरुष असतील तर यासंबंधात आलेला अनुभव चांगला नाही. म्हणून महिलांचे प्रमाण जास्त ठेवण्यास मदत होईल असे वाटते. तसेच आपणाला असेही दाखवून देता येईल की, सुधारणा म्हणून महाराष्ट्र शासन महिलांना सर्व क्षेत्रामध्ये उत्तेजन देत आहे व आंतरराष्ट्रीय स्तरावर तसेच कर्ज पुरवठा करणा-या संस्थांकडून श्रेय घेता येईल. श्री.किरिट सोमैय्या, आमदार यांचे असे मत पडले की, आंतरराष्ट्रीय श्रेय मिळविण्याऐवजी ही तरतूद कितपत अंमलात

आणता येईल याचा विचार करावा लागेल. महिलांना जर योजनेमध्ये ६६.६६ टक्के प्रतिनिधीत्व दिले तर योजना पुढे नेणे शक्य होणार नाही. यावर अध्यक्षांनी असा निर्णय दिला की, झोपडपट्टीवासियांच्या ज्या कांही नोंदणीकृत व नियोजित संस्था आहेत त्यामध्ये महिलांना ३३.३३ टक्के प्रतिनिधीत्व द्यावे.

यानंतर कमीतकमी घनता किती असावी, यावर चर्चा झाली. मु.का.अ. यांनी असे सांगितले की, आरक्षणांची अंमलबजावणी करुन प्रति हेक्टरी ५०० सदनिका निव्वळ घनता ठेवली आहे. यावर श्री.शशी प्रभू, वास्तुशास्त्रज्ञ यांनी असे सांगितले की, कमीतकमी घनता मोजतांना जर १५ टक्के मोकळी जागा वजा केली नाही तर योजना व्यवहार्य होणार नाही.

त्यानंतर मा.राज्यमंत्री [गृ.नि.] यांनी असा प्रश्न विचारला की, खुल्या विक्रीच्या घटकास केव्हा परवानगी मिळेल? त्यावर मु.का.अ. यांनी प्रारुपातील २.६ ची तरतूद वाचून दाखविली व पुनर्वसन घटक आणि खुल्या विक्रीचा घटक यांच्या मंजूरीचे प्रमाण विशद करुन सांगितले. त्यास सहमती मिळाली.

त्यानंतर तात्पुरत्या संक्रमण शिबीरांसंबंधी चर्चा झाली. मु.का.अ. यांनी असे सांगितले की, विकासकांना उत्तेजन दिले तर कायम स्वरुपातील संक्रमण शिबीरासाठी थांबण्याची गरज राहणार नाही.

श्री.वायकर, सभापती, झो.सु.मंडळ यांनी असे सांगितले की, त्यांच्याकडे जोगेश्वरीतील झोपडपट्टीचे प्रकरण आहे. सदर झोपडपट्टी समुद्र सपाटीपासून ७२ मिटर उंच आहे. मात्र विमानपतन प्राधिकरणाच्या नियमाप्रमाणे त्या परिसरातील इमारतींची उंची ५० मिटर असणे गरजेचे आहे. तेव्हा तेथील झोपडपट्टीवासियांना काय सल्ला दिला जावा याची विचारणा केली. यावर अध्यक्षांनी असे सांगितले की, त्या झोपडपट्टीवासियांना इतरत्र बांधलेल्या संक्रमण शिबीरात हलवावे लागेल. कारण नागरी विमानपतन प्राधिकरणाने [केंद्र शासन] घालून दिलेल्या उंचीच्याबंधनातून सूट मागणे शक्य होणार नाही.

राज्यमंत्री [गृ.नि.] यांनी झोपडपट्टयांमध्ये जी औद्योगिक शेडस् आहेत त्यांच्या बाबतीत काय तरतूद आहे अशी विचारणा केली. त्यावर मु.का.अ. यानी प्रारूपातील ५.४ ची तरतूद वाचून दाखविली व त्यास राज्यमंत्र्यांनी सहमती दर्शविली व ३३.३३ टक्के आर.जी.चा मुद्दा उपस्थित केला. या संदर्भात त्यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, त्यांची उंचली व इतर बंधने यांचा विचार करून या अटीतून सूट दिली जाऊ शकते.

प्रधान सचिव [महसूल] यांनी असा मुद्दा मांडला की, त्यांच्याकडे शासनाच्या जमीनीवर बसलेल्या संस्थांची २/३ प्रकरणे असून त्यांनी महसूल विभागास असे कळविले आहे की, त्यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवायची नसून, शासन ज्याप्रमाणे नियोजित सहकारी संस्थांना जमीन उपलब्ध करून देते त्याचप्रमाणे त्यांच्या संस्थांना जमीन द्यावी. त्यामुळे त्यांना सदनिकेचे क्षेत्रफळाचे बंधन राहणार नाही व सदनिकांचे आकारमान मोठे करून घेता येईल. तेव्हा, अशा प्रकरणी परवानगी द्यावी किंवा कसे? त्यावर प्रधान सचिव [गृ.नि.] यांनी अशी प्रतिक्रिया व्यक्त केली की, अशी परवानगी देण्यात येऊ नये. किंबहुना, त्यांचा तसा आग्रहच असेल तर त्यांचे सत्वर निष्कासन केले जावे. मा.अध्यक्षांनी या प्रस्तावास सहमती दिली. प्रधान सचिव [म.] यांनी पुढे असे स्पष्ट केले की, प्रारूप विकास नियंत्रण नियमावलीमध्ये भाडेपट्टयाची जी तरतूद आहे ती मान्य करावी. या तरतूदीप्रमाणे भाडेपट्टयाचे करारपत्राचे प्रारूप तयार करण्यात येत आहे. त्यावर अध्यक्षांनी असा निर्णय दिला की, श्री.बहादूर, प्र.स. यांनी हे काम तात्काळ करून घ्यावे.

---------

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या दि. २०/७/९६ च्या बैठकीस उपस्थित सन्माननीय सदस्यांची यादी.

| अ.क्र. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १] | श्री. नामदार मनोहर जोशी<br>[मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य] | अध्यक्ष |
| २] | मा. नामदार श्री. चंद्रकांत खैरे<br>[मंत्री- गृहनिर्माण] | सदस्य |
| ३] | मा. नामदारश्री. रविंद्र माने<br>[राज्यमंत्री-नगरविकास] | सदस्य |
| ४] | मा. नामदार श्री. प्रकाश मेहता<br>[राज्यमंत्री- गृहनिर्माण] | सदस्य |
| ५] | मा. नामदार श्री. दिनेश अफझूलपूरकर<br>[मुख्य सचिव] | सदस्य |
| ६] | श्री. आर. सी. सिन्हा<br>[अतिरिक्त मुख्य सचिव] | सदस्य |
| ७] | श्री. गिरीश गोखले<br>[मुंबई महानगरपालिका आयुक्त] | सदस्य |
| ८] | श्री. बी. एन बहादूर<br>[प्र. स. ] [महसूल व वन विभाग] | सदस्य |
| ९] | श्री. अजित वर्टी<br>[प्रधान सचिव, गृहनिर्माण] | सदस्य |
| १०] | डी. टी. जोसेफ<br>[मुख्य कार्यकारी : अधिकारी]<br>झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | सदस्य |
| ११] | श्री. शशि प्रभू<br>[वास्तुशास्त्रज्ञ] | सदस्य |
| १२] | श्रीमती. शीला पटेल<br>[ | सदस्य |
| १३] | श्री. शिरीष पटेल | सदस्य |
| १४] | श्री. बी. जी. मोरे<br>[प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग | सदस्य |
| १५] | श्री. किरीट सोमय्या<br>[विधान सभा सदस्य ] | सदस्य |
| १६] | श्री. रविंद्र वायकर<br>[सभापती/मुंबई झोपडपट्टी सुधारणा मंडळ] | विशेष निमंत्रित |

213/८५

दिनांक २० जुलै १९९६ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीचे

कार्यवृत्त

| अ. क्र | बैठकीत झालेले निर्णय | निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी | अंमलबजावणी करण्यासाठी ठरविलेली कालमर्यादा |
|---|---|---|---|
| १ | २ | | |
| १) | बाब क्र.२/१ अन्वये प्राधिकरणाच्या दि.१५/३/९६ च्या बैठकीच्या कार्यवृत्तास मंजूरी देण्याचा ठराव पारीत झाला. | कांही नाही | कांही नाही |
| २) | बाब क्र.२/२ अन्वये प्राधिकरणाच्या मंजूर कार्यालयीन चौकटीप्रमाणे अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती संबंधात सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे निर्णय झाले :- | | |
| अ) | प्राधिकरणाच्या सेवेत घेतल्या जाणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना विशेष वेतन, निवासाची व्यवस्था इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यास मंजूरी देण्यात आली. | मुख्य कार्यकारी अधिकारी | प्रश्न उद्‌भवत नाही. गरज पडेल त्याप्रमाणे मु.का.अ. यांच्या स्तरावर गुणवत्ता लक्षात घेऊन निर्णय घेतले जातील. |
| ब) | प्रतिनियुक्तीने शासकीय अधिकारी कर्मचारी उपलब्ध होत नसतील तर प्राधिकरणाच्या कामाचा खोळंबा होऊ नये म्हणून गरज भासेल त्याप्रमाणे जाहिरातीद्वारे योग्य अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्त्या करण्यास मंजूरी देण्यात आली. | मुख्य कार्यकारी अधिकारी | वरीलप्रमाणे |
| ३) | बाब क्र.२/३ अन्वये प्राधिकरणाच्या स्थापनेनंतर कोणती महत्वाची कामे केली त्याची टिप्पणी माहितीसाठी सादर केली होती. | कांही नाही | कांही नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | बाब क्र.२/४ संबंधात खालील ठराव पारीत झाले :- | | |
| अ) | महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये प्रारुप झोपडपट्टी पुनर्वसन योजनेशी संबंधीत विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) परिशिष्ट-४, परिशिष्ट-७ब, संक्रमण शिबीरांची तरतूद इत्यादींच्या सुधारणांसह शासनाच्या नगर विकास विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याचा ठराव पारीत झाला.<br>यापुढे असा देखिल ठराव पारीत झाला की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना वरील कार्यवाही करण्यास प्राधिकृत करण्यात आले. | मुख्य कार्यकारी अधिकारी | दि. २५ जुलै १९९६ रोजी प्रारुप विकास नियंत्रण नियमावली ३३(१०), परिशिष्ट-४, परिशिष्ट-७ब शासनाच्या नगर विकास विभागाकडे कायद्यातील तरतूदीप्रमाणे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे. |
| ब) | झोपडपट्टी पुनर्बांधणी योजनांचे प्रस्तावांना प्राधिकरणाकडून यापुढे मंजूरी दिली जाईल असा ठराव पारीत झाला. | मुख्य कार्यकारी अधिकारी | प्रारूप विकास नियंत्रण नियमावली शासन राजपत्रात अंतिमत: प्रसिध्द झाल्यानंतर एमआरटीपी कायद्याच्या कलम ४६ नुसार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना योजनांना मंजूरी देण्याचे अधिकार प्राप्त होतील. |
| क) | झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या एखाद्या प्रकरणात मंजूर नियमावली बाहेरील सवलत देण्याचे अधिकार एक तर प्राधिकरणास असतील किंवा अध्यक्षांना असतील असा ठराव मंजूर झाला. | | योजना मंजूरीच्या कामास प्रारंभ झाल्यानंतर अशा प्रकरणी सदर निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली जाईल. |
| ड) | प्राधिकरणाच्या बैठकीत मंजूरीसाठी सादर केलेल्या प्रारुप विकास नियंत्रण | मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव (न.वि.), | या निर्णयाप्रमाणे दिनांक २९/१०/९६ रोजी बैठक |

2/7/05

| | | |
|---|---|---|
| नियमावलीमध्ये ज्या कांही तांत्रिक मुद्यांमध्ये बदल करावयाचे आहेत त्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एका लहानशा उपसमितीकडून असे बदल शासन स्तरावर करावे असा निर्णय झाला. | मुख्य कार्यकारी अधिकारी | घेण्यात येऊन आवश्यक ते बदल करण्यात आले आहेत. |
| झोपडपट्टीवासियांच्या नियोजीत अथवा नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये महिलांचा सहभाग ३३.३३ टक्के असावा असा ठराव पारीत झाला. | कांही नाही | कांही नाही. |